| | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | |
|---|---|---|
| जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो/ /२०२५ | पुणे दिनांक :- /०६/२०२५ | |

**प्रेसनोट**

**दिनांक २०/०६/२०२५** रोजी, **संत श्री.तुकाराम महाराज** व **संत श्री. ज्ञानेश्वर महाराज** यांच्या पालखी पुणे शहरात एकत्रित येत असून, दोन्ही पालख्यांचा पुणे शहरातील आगमनामुळे रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता तसेच वाहतुक सुरक्षीत व सुरळीत राहणे गरजेचे आहे, त्यासाठी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन पालखी मार्ग व परिसरातील वाहतूकीमध्ये **आवश्यकतेनुसार** तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे बदल करीत आहे.

## * पालखी आगमन *

**१) संत श्री.तुकाराम महाराज व संत श्री. ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी पुणे शहरात दिनांक २०/०६/२०२५ रोजी आगमन होणार आहे. आगमन मार्गावरील वाहतुक (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) बंद करण्यात येणार असुन सदर वाहतूकीसाठी पर्यायी मार्ग खालील प्रमाणे.**

**(अ) संत श्रेष्ठ श्री.तुकाराम महाराज पालखी आगमन मार्ग, वाहतूकीसाठी बंद रस्ते व पर्यायी मार्ग –**

(१) **संत श्री. तुकाराम महाराज पालखीमार्ग** :- दि. २०/०६/२०२५ रोजी विठ्ठल मंदिर आकुर्डी येथुन निघुन चिंचवड, पिंपरी, वल्लभनगर नाशिक फाटा, फुगेवाडी, दापोडी, **हॅरीस ब्रिज, बोपोडी चौक, खडकी रेल्वे स्टेशन, मरिआई गेट चौक, वाकडेवाडी पाटील इस्टेट चौक, इंजिनिअरींग कॉलेज चौक**

- संत श्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज यांची पालखी दिनांक २०/०६/२०२५ रोजी आकुर्डी येथून येणार असल्याने खालील नमूद रस्ते आवश्यकतेनुसार वाहतूकीसाठी बंद करण्यात येणार असून वाहनचालकांनी या मार्गांवर न येता दिले पर्यायी मार्गांचा वापर करावा

**संत तुकाराम महाराज पालखी बोपोडी चौकात पोहोचे पर्यंत**

**बोपोडी चौक ते चर्च चौक,**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते व कालावधी (पहाटे ०५.०० वा. ते सायं. २४.०० वा. पर्यंत) | वाहतूकीसाठी पर्यायी रस्ते व वेळ |
|---|---|---|
| १ | **बोपोडी चौक ते खडकी बाजार** | खडकी बाजार अंतर्गत रस्त्याने चर्च चौक (सकाळी १०.०० वा. पर्यंत) |
| २ | **चर्च चौक** | भाऊ पाटील रोड - ब्रेमेन चौक - औंध मार्गे (सकाळी १०.०० वा. पर्यंत) |
| ३ | **पोल्ट्री फार्म चौक** | रेल्वे पोलीस मुख्यालया समोरून औंध रोड - ब्रेमेन चौक (सकाळी १०.०० वा. पर्यंत) |
| ४ | **मुळा रोड ते कमल नयन बजाज उद्यान चौक** | अंतर्गत रस्त्याचा वापर करावा (सकाळी १०.०० वा. पर्यंत) |

**पालखी इंजिनियरींग कॉलेज चौक पोहोचे पर्यंत**

**चर्च चौक ते इंजिनियरींग कॉलेज चौक,**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | वाहतूकीसाठी पर्यायी रस्ते |
|---|---|---|
| १. | **जुना मुंबई-पुणे मार्गावरून पुण्याकडे येणारी सर्व प्रकारची वाहने बंद करण्यात येतील.** (पहाटे ०५.०० वा. ते सायं. २४.०० वा. पर्यंत) | पिंपरी चिंचवड कडुन येऊन पुणेकडे जाणारे वाहनांनी भाऊ पाटील रोडवरून औंध रोड मार्गे ब्रेमेन चौकातून इच्छितस्थळी जावे. (दुपारी १२.०० वा. पर्यंत) |
| २. | **आर.टी.ओ. ते इंजिनिअरींग कॉलेज चौक** (पहाटे १२.०० वा. ते सायं. २४.०० वा. पर्यंत) | १. आर.टी.ओ. चौक -शाहीर अमर शेख चौक -कुंभार वेस चौक<br>२. आर.टी.ओ चौक -जहांगीर चौक - आंबेडकर सेतू ते गुंजन मार्गे<br>(दुपारी १५.०० वा. पर्यंत) |
| ३. | **सादलबाबा दर्गा ते पाटील इस्टेट चौक** (पहाटे ०५.०० वा. ते सायं. २४.०० वा. पर्यंत) | पर्णकुटी चौक - बंडगार्डन ब्रीज - महात्मा गांधी चौक मार्गे |

**(ब) संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज पालखी आगमन मार्ग, वाहतूकीसाठी बंद रस्ते व पर्यायी मार्ग –**

(१) दि. २०/०६/२०२५ रोजी श्री. क्षेत्र आळंदी येथुन निघुन वडमुखवाडी, च-होली फाटा, दिघी मॅगझीन, बोपखेल फाटा, बी.ई.जी. ट्रेनिंग बटालीयन नं. २, म्हस्के वस्ती कळस ओढा, विश्रांतवाडी, फुलेनगर, साप्रस चौकी, आळंदी रोड जक्शंन, चंद्रमा चौक, डावीकडे वळून सादलबाबा चौक, उजवीकडे वळून संगमवाडी रोडने पाटील ईस्टेट चौक, डावीकडे वळून इंजिनीअरींग कॉलेज चौक

- **संत श्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी दिनांक २०/०६/२०२५ रोजी आळंदी येथून येणार असल्याने खालील नमूद रस्ते आवश्यकतेनुसार वाहतूकीसाठी बंद करण्यात येणार असून वाहन चालकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | बंद कालावधी | वाहतूकीसाठी पर्यायी रस्ते |
|---|---|---|---|
| १. | **कळस फाटा ते बोपखेल फाटा / विश्रांतवाडी चौक** | पहाटे ०३.०० वा. ते सायंकाळी २०.०० वा पर्यंत | धानोरी रोडने व अंतर्गत रोडने (दुपारी १३.०० वा. पर्यंत) |
| २. | **मेंटल हॉस्पीटल कॉर्नर ते आळंदी रोड जंक्शन** | | जेल रोड - विमानतळ रोड मार्गे (दुपारी १३.०० वा. पर्यंत) |
| ३. | **सादलबाबा दर्गा ते पाटील इस्टेट रोड** | पहाटे ०५.०० वा. ते रात्रौ २४.०० वा. पर्यंत | पर्णकुटी चौक - गुंजन चौक - ऐअर पोर्ट रोड मार्गे |
| ४. | **चंद्रमा चौक ते आळंदी रोड** | पहाटे ०५.०० वा. ते रात्रौ १९.०० वा. पर्यंत | चंद्रमा चौकाकडे जाणारी वाहने हि तारकेश्वर चौक - पर्णकुटी चौक - गुंजन चौक - ऐअर पोर्ट रोड ने इच्छितस्थळी |
| ५. | **नविन आंबेडकर सेतू ते चंद्रमा चौक बंद** | | |
| ६. | **होळकर ब्रीज ते चंद्रमा चौक व होळकर ब्रीज ते साप्रस चौकी बंद** | | |

**टिप :- सदर कालावधीमध्ये फक्त आळंदीकडे जाणारे रस्ते बंद राहणार असून इतर रस्ते वाहतूकीकरीता सुरू राहतील**

(क) संत श्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज व संत श्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालख्यांचे एकत्रित मार्ग -

पुणे-मुंबई रोडने इंजिनियरींग कॉलेज चौक, संचेती चौक, सिमला ऑफीस चौक, वीर चाफेकर चौक, ज्ञानेश्वर पादुका चौक, तुकाराम पादुका चौक, गुडलक चौक, खंडोजीबाबा चौक, टिळक चौक, लक्ष्मी रोडने विजय टॉकीज चौक, सेवासदन चौक, बेलबाग चौक, बुधवार चौक, पासोडया विठोबा मंदीर, मोती चौक, सोन्या मारुती चौक, हमजेखान चौक, डुल्या मारुती चौक, नानापेठ पोलीस चौकी चौक येथे आलेनंतर संत तुकाराम महाराजांची पालखी अरुणा चौक मार्गे निवडुंगा विठोबा मंदीर येथे जावून मुक्काम करेल तसेच संत श्री.ज्ञानेश्वर महाराजांची पालखी अशोक चौक मार्गे पालखी विठोबा मंदीर येथे जावून मुक्काम करेल.

❖ **संत श्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज व संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या दिनांक २०/०६/२०२५ रोजी अनुक्रमे निवडुंग्या विठोबा मंदीर, नाना पेठ व पालखी विठोबा मंदीर, भवानीपेठ, पुणे येथे मुक्कामास येणार असल्याने खालील नमूद रस्ते आवश्यकतेनुसार वाहतूकीसाठी बंद करण्यात येणार असून वाहनचालकांनी या मार्गांवर न येता दिले पर्यायी मार्गांचा वापर करावा**

➢ ***(अ)* इंजिनियरींग कॉलेज चौक ते तुकाराम पादुका चौक**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | बंद कालावधी | वाहतूकीसाठी पर्यायी रस्ते |
|---|---|---|---|
| १. | **रेंजहिल चौक ते संचेती चौक (गणेश खिंड रोड )** | **सकाळी ०८.०० वा. पासुन ते २४.०० वा. पर्यंत** | रेंज हिल्स - सेनापती बापट रोड - नळ स्टॉप चौक |
| २. | **खंडोजीबाबा चौक ते विर चाफेकर चौक (फर्ग्युसन रोड)** | | खंडोजीबाबा चौक - कर्वे रोड - सेनापती बापट रोड - रेंजहिल |
| ३. | **गाडगीळ पुतळा ते स.गो बर्वे (शिवाजी रोड)** | | गाडगीळ पुतळा - कुंभारवेस चौक - आर.टी.ओ. चौक - जहांगीर मार्गे |
| ४. | **डेक्कन वाहतूक विभाग ते थोपटे पथ चौक (मॉडर्न कॉलेज रोड)** | | घोले रोड व आपटे रोड (दुपारी १४.०० वा. पर्यंत) |
| ५. | **कुंभार वेस चौक ते गाडगीळ पुतळा चौक आणि मालधक्का ते शाहीर अमर शेख चौक** | | **१.** कुंभारवेस- पवळे चौक - फडके हौद चौक<br>**२.** मालधक्का चौक - नरपतगीर चौक- पंधरा ऑगस्ट चौक - कमला नेहरू हॉस्पीटल<br>(दुपारी १४.०० वा. पर्यंत) |

➢ ***(ब)* तुकाराम पादुका चौक ते बेलबाग चौक**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | बंद कालावधी | वाहतूकीसाठी पर्यायी रस्ते |
|---|---|---|---|
| १. | **टिळक चौक ते विर चाफेकर चौक (फर्ग्युसन रोड)** | **दुपारी १२.०० वा. ते रात्रौ २४.०० वा. पर्यंत** | शास्त्री रोड - सेनादत्त चौकी चौक - म्हात्रे पुल - नळ स्टॉप -सेनापती बापट रोड - रेंजहिल |
| २. | **शनिवार वाडा ते स.गो बर्वे - संचेती चौक (शिवाजी रोड)** | | शनीवार वाडा- कुंभार वेस - मालधक्का चौक - पुणे स्टेशन - अलंकार चौक- जहांगीर चौक - आर.टी.ओ. चौक (दुपारी १५.०० वा. पर्यंत) |
| ३. | **शास्त्री रोड सेनादत्त चौकाजवळ** | | **१.** म्हात्रे पुला मार्गे |

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | बंद कालावधी | वाहतूकीसाठी पर्यायी रस्ते |
|---|---|---|---|
| | **बंद शेलारमामा चौक ते खंडोजीबाबा चौक** | **दुपारी १४.०० वा. पासुन रात्रौ २४.०० वा. पर्यंत** | २. गरवारे कॉलेज मार्गे- एस.एम.जोशी पुल ते कर्वे रोड किंवा प्रभात रोड मार्गे<br>३. कर्वे रोड - रसशाळा चौक |
| ४. | **टिळक रोड - पूरम चौक ते अलका टॉकीज चौक** | | विश्व हॉटेल- ना.सि. फडके चौक -नाथ पै चौक - शास्त्री रोड - सेनादत्त चौकी चौक - म्हात्रे पुल- नळ स्टॉप चौक |
| ५. | **लक्ष्मी रोड - बेलबाग चौक ते टिळक चौक** | | बेलबाग चौक, शिवाजी रोड ते गोटीराम भैय्या चौक - राष्ट्रभुषण चौक- हिराबाग चौक - विश्व हॉटेल -ना.सि. फडके चौक- नाथ पै चौक - शास्त्री रोड - सेनादत्त चौकी चौक - म्हात्रे पुल-नळ स्टॉप (सायं १७.०० वा. पर्यंत) |
| ६. | **शिवाजी रोड - जिजामाता चौक ते बुधवार चौक - बेलबाग चौक** | **दुपारी १४.०० वा. पासुन रात्रौ २४.०० वा. पर्यंत** | १. फुटका बुरूज – गाडगीळ पुतळा / नदीपात्रातील रस्ता (सायं १७.०० वा. पर्यंत)<br>२. जिजामाता चौक - फडके हौद चौक |
| ७. | **लक्ष्मी रोड - संत कबीर चौक - बेलबाग चौक** | | संत कबीर चौक - रास्ता पेठ चौक / सेव्हन लव्ह्ज चौक (सायं १७.०० वा. पर्यंत) |
| ८. | **शनीपार चौक ते सेवा सदन चौक** | | शनीपार चौकातून उजवीकडे रामेश्वर चौक - गोटीराम भैय्या चौक- गोविंद हलवाई चौक / उजवीकडे नागनाथ पार चौक (सायं १७.०० वा. पर्यंत) |
| ९. | **नेहरू चौक -सोन्या मारूती चौक** | | नेहरू चौक - गोटीराम भैय्या चौक - रामेश्वर चौक (सायं १७.०० वा. पर्यंत) |

➢ ***(क)*****बेलबाग चौक ते निवडुंगा विठोबा मंदीर/पालखी विठोबा मंदीर**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | बंद कालावधी | वाहतूकीसाठी पर्यायी रस्ते |
|---|---|---|---|
| १. | **लक्ष्मी रोड - बेलबाग चौक ते सेवासदन चौक** | **दुपारी १४.०० वा पासुन रात्रौ २४.०० वा पर्यंत** | बेलबाग चौक - रामेश्वर चौक - शनिपार चौक - बाजीराव रोडने इच्छितस्थळी (सायं १७.०० वा. पर्यंत) |
| २. | **शिवाजी रोड - जिजामाता चौक ते बुधवार चौक - बेलबाग चौक** | | १.फुटका बुरूज– गाडगीळ पुतळा-कुंभारवेस<br>२. फुटका बुरूज - नदीपात्रातील रस्ता<br>३.जिजामाता चौक - फडके हौद चौक (सायं १७.०० वा. पर्यंत) |
| ३. | **लक्ष्मी रोड - संत कबीर चौक - बेलबाग चौक** | | संत कबीर चौक - रास्ता पेठ चौक / सेव्हन लव्ह्ज चौक (दुपारी १७.०० वा. पर्यंत) |
| ४. | **देवजीबाबा चौक ते हमजेखान चौक** | | गणेश रोड - फडके हौद चौक मार्गे (सायं १७.०० वा. पर्यंत) |
| ५. | **सोमवार पेठ पोलीस चौकी ते डुल्या मारूती चौक** | | गणेश रोड - फडके हौद चौक मार्गे (सायं १७.०० वा. पर्यंत) |
| ६. | **रामोशी गेट ते पालखी विठोबा मंदीर संत कबीर चौक ते चाचा हलवाई चौक** | | नेहरू रोड मार्गे |

➢ **<u>इतर निर्बंध</u>**

(१) पालख्यांच्या मार्गावरील वारकऱ्यांची व भाविकांची गैरसोय होवू नये या उद्देशाने व सुरक्षिततेच्या दृष्टीने या मार्गाचे दोन्ही बाजूस तसेच त्यास छेदणारे इतर उप-रस्त्यांवर आतील भागात १०० मी. पर्यंत सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास तात्पुरता प्रतिबंध करण्यात येत आहे.

(२) पालख्यांचे आगमन व प्रस्थान मार्गावरील पालखी पुढे जाऊन मागील रस्ता जस-जसा वाहतूकीस योग्य होईल त्याप्रमाणे मागील रस्त्यावरील वाहतूक टप्या-टप्याने पुर्ववत करण्यात येईल.

(३)दिनांक **२०/०६/२०२५** रोजी १२.०० वा. पासून दिनांक २२/०६/२०२५ रोजी,पालखी प्रस्थान होई पर्यंत **संत श्री. तुकाराम महाराज** व **संत श्री. ज्ञानेश्वर महाराज** यांच्या पालख्या पुणे शहरात मुक्कामास येत आहेत. संत तुकाराम महाराज यांचे पालखीचा मुक्काम **निवडूंग्या विठोबा मंदीर** तसेच संत श्री. ज्ञानेश्वर महाराज यांचे पालखीचा मुक्काम **पालखी विठोबा मंदीर** येथे आहे. त्यामुळे या मंदीरा समोरील अनुक्रमे **१.**<u>अरूणा चौक ते पारशी अगेरी</u> व **२.**<u>पालखी विठोबा चौक ते बाबासाहेब किराड पथ जंक्शन</u> या रस्त्यांवर **सर्व प्रकारच्या वाहनांना ये-जा करण्यास व पार्कीग करण्यास मनाई** करण्यात येत आहे तसेच या परिसरातील वाहतूक भाविकांच्या गर्दीनुसार आवश्यकतेप्रमाणे वळविण्यात येणार आहे.

(४) संत श्री.ज्ञानेश्वर महाराज व संत श्री.तुकाराम महाराज पालख्यांचा सोहळा पुणे शहरात सुरक्षित व्हावा व वाहतूकीची कोंडी होवू नये यासाठी सर्व नागरीकांनी वाहतूक व्यवस्थेतील बदल अंमलात आणून तसेच पोलीसांनी त्या-त्यावेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे.

➢ **पालखीच्या दिंडयांसोबत येणा-या वाहनांच्या पर्यायी मार्गाबाबत :-**

**श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखीच्या दिंडयांसोबत येणा-या वाहनांनी खालील पर्यायी मार्गांचा वापर करावा.**

(१) दिनांक २०/०६/२०२५ रोजी आळंदी कडून विश्रांतवाडी पर्यंत येणाऱ्या वाहनांनी आळंदी - मरकळ - तुळापुर - फुलगांव - लोणीकंद - वाघोली - लोहगांव/ येरवडा या मार्गाचा वापर करावा.

(२) दिनांक २०/०६/२०२५ रोजी इंदीरानगर, दत्तमंदीर पासून मरिआई गेटकडे जाणाऱ्या वाहनांनी साप्रस चौकी जंक्शन - चंद्रमा चौक - सादलबाबा दर्गा - पर्णकुटी चौक या मार्गाचा वापर करावा.

(३) दिनांक २२/०६/२०२५ रोजी पुण्याकडून - सासवडकडे जाणाऱ्या वाहनांनी

- भैरोबानाला चौक - लुल्लानगर चौक - कोंढवा खडीमशीन चौक - बोपदेव घाट मार्गे सासवड किंवा
- मंतरवाडी फाटा - फुरसुंगी मार्गे ऊंड्री-पिसोळी - खडी मशीन चौक मार्गे बोपदेव घाटाकडून सासवड या मार्गाचा वापर करावा.

या संबंधी अधिक माहिती हवी असल्यास वाहतूक मुख्य नियंत्रण कक्ष, दुरध्वनी क्रमांक **२६६८५००० / २६६८४०००** संपर्क साधवा.

(अमोल झेंडे)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**

**<u>प्रत सविनय सादर</u>**

१) मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर
२) मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर

**वाहतुक शाखा, पुणे शहर**
**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**
**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे**

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./ /२०२५ दिनांक :- /०६/२०२५**

# * प्रेसनोट पालखी प्रस्थान *

संत श्री.तुकाराम महाराज व संत श्री.ज्ञानेश्वर महाराज यांच्या दोन्ही पालख्या दिनांक २०/०६/२०२५ रोजी पुणे शहरात दाखल झालेल्या असून, दिनांक २२/०६/२०२५ रोजी,संत श्री.तुकाराम महाराज यांची पालखी श्री.निवडुंगा विठ्ठल मंदीर, नानापेठ, पुणे येथून सोलापूर रोड मार्गे पंढरपूरकडे प्रयाण करणार आहे. तसेच संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी पालखी विठोबा मंदीर, भवानीपेठ, पुणे सासवड रोडमार्गे पंढरपूरकडे प्रयाण करणार आहे. त्याकरीता रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता वाहतुक सुरक्षीत व सुरळीतपणे राहणे गरजेचे आहे, त्यासाठी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा.फायरब्रिगेड,पोलीस वाहने,रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन पालखी मार्ग व परिसरातील वाहतूकीत **आवश्यकतेनुसार** तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे बदल करीत आहे.

➢ **संत श्री.तुकाराम महाराज व संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज पालख्यांचे प्रस्थानाचा मार्ग-**

दिनांक **२२/०६/२०२५**रोजी **संत श्रेष्ठ श्री.तुकाराम महाराज यांची पालखी** निवडुंगा विठोबा मंदीर येथून निघून अरुणा चौक, समाधान चौक, पिंपरी चौक, ए.डी.कॅम्प चौक, रामोशीगेट चौकी चौक, भवानी माता मंदीर, मुक्ती फौज चौक, पुलगेट चौकी चौक, मम्मादेवी चौक, सोलापूर रोडने हडपसर गाडीतळ येथून सरळ सोलापूर रोडने लोणी-काळभोर मार्गे पंढरपूरकडे प्रयाण करेल.

तसेच **संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी** पालखी विठोबा मंदीर, भवानीपेठ, येथून रामोशीगेट चौकी चौक, भवानी माता मंदीर, मुक्ती फौज चौक, पुलगेट चौकी चौक, मम्मादेवी चौक, सोलापूर रोडने हडपसर गाडीतळ येथून उजवीकडे वळून सरळ सासवड मार्गे पंढरपूरकडे प्रयाण करेल.

➢ **दिनांक २२/०६/२०२५ रोजी संत श्री.तुकाराम महाराज यांची पालखी निवडुंगा विठोबा मंदीर, नानापेठ येथून हडपसर मार्गे पंढरपुरकडे प्रस्थान करणार असुन संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी, पालखी विठोबा मंदीर, भवानीपेठ येथून सासवड मार्गे पंढरपुरकडे प्रस्थान करणार आहे. त्यामुळे खालील नमूद रस्ते पहाटे ०२.०० ते पालखी पुणे शहर आयुक्तालयाचे हद्दीबाहेर जाईपर्यंत पालखी व वारकरी असलेल्या मार्गावरील वाहतूक टप्प्या-टप्प्याने बंद करण्यात येणार असून वाहनचालकांनी या मार्गांवर न येता दिले पर्यायी मार्गांचा वापर करावा :-**

| अ.नं. | वाहतूकीसाठी बंद रस्ते | बंद कालावधी | वाहतूकीसाठी पर्यायी रस्ते |
|---|---|---|---|
| १. | **संत कबीर चौक - बेलबाग चौक** | **पहाटे ०२.०० वा पासुन दुपारी १४.०० वा पर्यंत** | संत कबीर चौक - रास्ता पेठ पॉवर हाऊस- जिजामाता चौक - बेलबाग चौक |
| २. | **संत कबीर चौक - रामोशी गेट चौक** | | पॉवर हाऊस - फडके हौद- देवजीबाबा चौक - हमजेखान चौक |
| ३. | **सेव्हन लव्ह चौक - रामोशी गेट चौक** | | सेव्हन लव्ह चौक- जेधे चौक |
| ४. | **गोळीबार मैदान - सेव्हन लव्ह चौक** | | गोळाबार मैदान - सी.डी.ए. चौक - सॅलीसबरी पार्क / लुल्ला नगर चौक- गंगाधाम चौक |
| ५. | **मम्मादेवी चौक - गोळीबार मैदान** | | वानवडी बाजार चौक - लुल्लानगर चौक |

| | | | |
|---|---|---|---|
| | | **पहाटे ०२.०० वा पासुन दुपारी १४.०० वा पर्यंत** | — गंगाधाम चौक |
| ६. | **बिशप स्कुल - मम्मादेवी चौक** | | बिशप स्कुल — पाण्याची टाकी - काहुन रोड - मोरओढा ब्रीज - घोरपडी |
| ७. | **वानवडी बाजार ते मम्मादेवी चौक** | | वानवडी बाजार चौक — शिंदे छत्री- जगताप चौक - रामटेकडी -ससाणेनगर |
| ८. | **ट्रायलक चौक, एम.जी रोड - रामोशी गेट चौक** | | एम.जी. रोड ते डॉ. आंबेडकर पुतळा चौक - बॅनर्जी चौक |
| ९. | **मोरओढा चौक - भैरोबानाला चौक** | | **१.** सोलापूर बाजुला जाण्यासाठी- घोरपडी गांव - रेल्वे गेट- केशवनगर चौक मार्गे किंवा<br>**२.** कोरेगांव पार्क जंक्शन-नॉर्थ मेन रोड-एबीसी फार्म चौक-केशवनगरमार्गे |
| १०. | **भैरोबानाला - मम्मादेवी चौक** | **पहाटे ०५.०० वा पासुन रात्री २४.०० वा पर्यंत** | **१.**भैरोबानाला - वानवडी बाजार चौक - लुल्ला नगर चौक<br>**२.**भैरोबानाला-एम्प्रेस गार्डन रोड - मोरओढा |
| ११. | **जांभुळकर चौक - फातीमा नगर चौक** | | जांभुळकर चौक-जगताप चौक |
| १२. | **बी.टी.कवडे जंक्शन, काळुबाई जंक्शन, रामटेकडी जंक्शन, वैदुवाडी जंक्शन, जुना कॅनॉल रोड जंक्शन, मगरपट्टा (मुंढवा) जंक्शन, हडपसर वेस जं.** | | पालखी पास होईपर्यंत केवळ अंतर्गत रस्त्यांचा वापर सुरू ठेवण्यात येणार आहे. |
| १३. | **सिरम फाटा जंक्शन ते सोलापूर रोड १५ नंबर फाटा ते सोलापूर रोड** | | पालखी व दिंडया पास होताना तात्पुरत्या स्वरूपामध्ये बंद ठेवून प्रसंगानुरूप सोलापूर रोडला प्रवेश देण्यात येईल. |
| १४. | **मंतरवाडी फाटा ते सासवड** | | पालखी सासवड येथे मुक्कामाचे ठिकाणी पोहचेपर्यंत कोणतेही वाहन दिवेघाटाकडे न सोडता मंतरवाडी फाटा-खडी मशिन चौक - बोपदेव घाट - सासवड मार्गे वळविण्यात येईल. |

➢ **<u>इतर निर्बंध</u>** :-

(१) पालख्यांच्या मार्गावरील वारकऱ्यांची व भाविकांची गैरसोय होवू नये या उद्देशाने व सुरक्षिततेच्या दृष्टीने या प्रस्थान मार्गाचे दोन्ही बाजूस तसेच त्यास छेदणारे इतर उप-रस्त्यांवर आतील भागात १०० मी. पर्यंत सर्व प्रकारची वाहने उभी करण्यास तात्पुरता प्रतिबंध करण्यात येत आहे.

(२) पालख्यांचे प्रस्थान मार्गावरील पालखी पुढे जाऊन मागील रस्ता जस-जसा वाहतूकीस योग्य होईल त्याप्रमाणे मागील रस्त्यावरील वाहतूक टप्प्या-टप्प्याने पुर्ववत करण्यात येईल.

(३) संत श्री.ज्ञानेश्वर महाराज व संत श्री.तुकाराम महाराज पालखी सोहळा पुणे पोलीस आयुक्तालयात सुरक्षित व्हावा व वाहतूकीची कोंडी होवू नये यासाठी सर्व नागरीकांनी वाहतूक व्यवस्थेतील बदल अंमलात आणून तसेच पोलीसांनी त्या-त्यावेळी दिलेल्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे.

**श्री.संत ज्ञानेश्वर महाराज पालखी दिंडयांसोबत जाणा-या वाहनांनी (पुण्याकडून - सासवडकडे जाणा-या वाहनांनी) १. भैरोबानाला चौक - लुल्लानगर चौक - कोंढवा खडीमशीन चौक - बोपदेव घाट मार्गे सासवड किंवा २. मंतरवाडी फाटा - फुरसुंगी मार्गे ऊंड्री-पिसोळी - खडी मशीन चौक मार्गे बोपदेव घाटाकडून सासवड या पर्यायी मार्गांचा वापर करावा.**

या संबंधी अधिक माहिती हवी असल्यास वाहतूक मुख्य नियंत्रण कक्ष, दुरध्वनी क्रमांक **२६६८५००० / २६६८४०००** वर संपर्क साधवा.

(अमोल झेंडे)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**

**<u>प्रत सविनय सादर</u>**

१) मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर
२) मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर

| | | |
|---|---|---|
| महाराष्ट्र पोलीस | **वाहतुक शाखा, पुणे शहर**<br>**पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,**<br>**बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे** | पुणे शहर वाहतूक पोलीस PUNE CITY TRAFFIC POLICE |

**जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो/ /२०२५ पुणे दिनांक :- /०६/२०२५**

**<u>प्रेसनोट</u>**

**दिनांक २०/०६/२०२५, २१/०६/२०२५ व २२/०६/२०२५** रोजी, **संत श्री.तुकाराम महाराज** व **संत श्री. ज्ञानेश्वर महाराज** यांच्या पालखी पुणे शहरात एकत्रित येत असून, दोन्ही पालख्यांचा पुणे शहरातील आगमनामुळे रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी टाळणेकरीता तसेच वाहतुक सुरक्षीत व सुरळीत राहणे गरजेचे आहे, त्यासाठी महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही.ए.०१९६/८७१/सीआर-३७/टिआरए-२,दिनांक-२७/०९/१९९६ चे नोटीफीकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अमोल झेंडे, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा पुणे शहर, अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहिका इ.) खेरीज करुन पालखीअ मार्ग व परिसरातील वाहतूकीमध्ये **आवश्यकतेनुसार** तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे बदल करीत आहे.

**१) संत श्री.तुकाराम महाराज व संत श्री. ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्यासाठी पुणे शहरात दिनांक १९/०६/२०२५ रोजी २२.०० वा. ते २३/०६/२०२५ रोजी २३.०० वा. दरम्यान जड व अवजड वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे. (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) प्रवेश बंदी असणारी ठिकाणे :-**

| अ.क्र | नमुद चौका पासुन पुढे प्रवेश मनाई / बंदी राहील | अ.क्र | नमुद चौका पासुन पुढे प्रवेश मनाई / बंदी राहील | अ.क्र | नमुद चौका पासुन पुढे प्रवेश मनाई / बंदी राहील |
|---|---|---|---|---|---|
| १ | बोपोडी चौक | ८ | लोणींकद (थेऊर फाटा) | १५ | नवले ब्रिज चौक |
| २ | राजीव गांधी (ब्रिज चौक) | ९ | तुळापुर फाटा | १६ | भुमकर चौक, |
| ३ | ब्रेमेन चौक | १० | राधा चौक | १७ | कात्रज चौक |
| ४ | बोपखेल चौक | ११ | सुस रोड | १८ | खडी मशिन चौक, कोंढवा |
| ५ | खराडी बायपास चौक | १२ | चांदणी चौक | १९ | मंतरवाडी फाटा चौक |
| ६ | केसनंद गाव | १३ | वारजे जंक्शन | २० | वैदवाडी चौक, हडपसर |
| ७ | केसनंद फाटा चौक | १४ | वडगाव ब्रिज, धायरी | २१ | थेऊर फाटा चौक (लोणी काळभोर) |

**२) पुणे शहरात प्रवेश करुन इतर शहरात मार्गस्त होणा-या वाहनानंसाठी पुणे शहरात जड, अवजड, लक्झरी व हलकी वाहनांना (अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) प्रवेश मनाई करण्यात येत आहे.**

| अ. क्र | येणा-या व जाणा-या वाहनांचा मार्ग | पर्यायी मार्गे |
|---|---|---|
| १ | **सोलापूर कडून पुणे शहर / नगर / नाशिक / मुंबई कडे** | येणारा मार्ग - चौफुला- केडगांव – पारगाव- नाव्हरे फाटा - नगर रोड - शिक्रापूर – आळेफाटा मार्गे |
| २ | **मुंबई कडुन नगर / सोलापूर कडे** | आळेफाटा ( अ.नगर कडे मार्गस्त ) - न्हावरे - केडगाव चौफला - सोलापुर रोड मार्गे इच्छितस्थळी |
| ३ | **कोल्हापुर / सांगली / सातारा - अ.नगर कडे** | कापुर ओव्हळ-सासवड-मोरगांव-केडगांव-चौफुला-न्हावरा-शिरुर मार्गे अ.नगर कडे जावे |
| ४ | **कोल्हापुर / सांगली / सातारा - मुंबई कडे** | कात्रज बायपास ( बेंगलोर हायवे ) मार्गे |

**३) संत तुकाराम महाराजांची पालखी दि. २३/०६/२०२५ रोजी लोणीकाळभोर येथुन प्रस्थान होऊन श्री. क्षेत्र पंढरपूरकडे जाणार असल्याने दि. २२/०६/२०२५ रोजी २३.०० वा. ते दि. २५/०६/२०२५ रोजी पालखी रोटी घाटात जाईपर्यंत थेऊर फाटा येथुन सोलापूरकडे जाणारी वाहतूक बंद करण्यात येत आहे.**

| अ. क्र | येणा-या व जाणा-या वाहनांचा मार्ग | पर्यायी मार्गे |
|---|---|---|
| १ | **थेऊर फाटा लोणीकाळभोर येथुन सोलापूरकडे** | थेऊर फाटा - थेऊर गाव - केसनंद - वाघोली/लोणीकंद - नगर रोड - शिक्रापुर - न्हावरे मार्गे इच्छितस्थळी जावे |
| २ | **खडी मशिन चौक येथुन मंतरवाडी फाट्याकडे** | खडीमशिन चौक येथुन कात्रज किंवा बोपदेव घाट मार्गे इच्छितस्थळी जावे |

**टिप - मा. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण व पोलीस उप आयुक्त पिंपरी चिंचवड वाहतुक विभाग यांचे प्रसिध्दीपत्रकाचे अवलोकन करावे.**

या संबंधी अधिक माहिती हवी असल्यास वाहतूक मुख्य नियंत्रण कक्ष, दुरध्वनी क्रमांक **२६६८५००० / २६६८४०००** वर संपर्क साधवा.

(अमोल झेंडे)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**

<u>प्रत सविनय सादर</u>

१) मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर
२) मा. पोलीस सह आयुक्त, पुणे शहर